# आपला शहरनामा

R.N.I. No.MAHMAR/2016/68474.


email : ashaharanama9@gmail.com / dmunde4444@gmail.com


## ७ वर्षांनंतर उगवला 'फिल्मीस्टाईल'ने सूड

**कुख्यात गुंड सादिक कालियाच्या पुतण्याला अटक**



**मुंबई:** जवळपास तीन दशकांनंतर घेतलेल्या सूडाच्या एका धक्कादायक प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने एका २९ वर्षीय तरुणाला आणि त्याच्या साथीदाराला अटक केली आहे. इक्बाल इब्राहिम सेलिया (७८) च्या हत्येप्रकरणी ही अटक करण्यात आली.

या प्रकरणातील मुख्य आरोपी शादिक जवार (२९) हा गुंड सादिक कालियाचा

पान २ वर


वर्ष : १० | अंक : ४५ | ठाणे | पाने : ४ | सोमवार २७ एप्रिल २०२६ ते रविवार ३ मे २०२६ | स्वागत मूल्य : २ रु.


## वेचक

### अमेरिकेत हिल्टन हॉटेलमध्ये गोळीबार; डोनाल्ड ट्रम्प व मिलानिया ट्रम्प सुरक्षित

**मोठी सुरक्षा कारवाई**



**अमेरिका:** अमेरिकेत हिल्टन हॉटेलमध्ये आयोजित एका मेजवानी कार्यक्रमादरम्यान गोळीबाराची घटना घडली. या कार्यक्रमाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी मिलानिया ट्रम्प उपस्थित होते.

घटनेनंतर सिक्रेट सर्व्हिसच्या सुरक्षा पथकाने तातडीने हस्तक्षेप करत दोघांनाही सुरक्षितपणे घटनास्थळावरुन बाहेर काढले. सुरक्षा यंत्रणांनी एका व्यक्तीला ताब्यात घेतल्याची माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. ही व्यक्ती कॅलिफोर्नियाची असल्याचेही त्यांनी सांगितले.

या घटनेत कोणतीही जिवितहानी झालेली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत म्हटले की, लोकशाहीमध्ये हिंसाचाराला कोणतेही स्थान नाही.

तसेच राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, मिलानिया ट्रम्प आणि उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स यांच्या सुरक्षिततेबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले आहे.

ही घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय ठरत असून सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा लक्ष केंद्रित झाले आहे.

### गहू उत्पादन स्थिर; हवामान आव्हानांवर मात

**कृषी मंत्रालयाची महत्वपूर्ण माहिती**



**नवी दिल्ली:** देशाच्या काही भागांमध्ये हवामान विषयक आव्हाने असूनही भारतातील गहू उत्पादन स्थिर असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ या वर्षात सुमारे ३.३४ कोटी हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर गव्हाची पेरणी करण्यात आली आहे. हे क्षेत्रफळ मागील वर्षांच्या तुलनेत स्थिर असून उत्पादन क्षमतेसाठी सकारात्मक मानले जात आहे.

हवामान बदलाशी सुसंगत, प्रगत आणि रोगप्रतिरोधक वाणांच्या वापरामुळे पिकांची उपज क्षमता अधिक मजबूत झाली आहे. तसेच कीड किंवा रोगामुळे उत्पादनात मोठी घट झाल्याचे कोणतेही अहवाल प्राप्त झालेले नाहीत.

वाढीव पेरणी क्षेत्र आणि सुधारित वाणांच्या वापरामुळे राष्ट्रीय पातळीवर गव्हाचे उत्पादन स्थिर राहण्यास मदत होणार असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास; 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे 1 मे रोजी उद्घाटन

**नवीन टोलवाढ नाही चारचाकी आणि बसेसमधून होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला परवानगी**

**मुंबई**

**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णत: 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली मिसिंग लिंकचा कामाची पाहणी



### घाटातील अपघात आणि विलंबाला कायमचा ब्रेक

### वेगवान आणि सुरक्षित प्रवासाने अर्थव्यवस्थेला मिळणार गती

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. 'मी स्वत: येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत,' असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे.

लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरु झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. 'या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील,' असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, 'मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.'

सुमारे ६ हजार ७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला ॲक्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली.

आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतिकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.

'अशा प्रकारचे प्रकल्प हे केवळ रस्ते नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे असतात. कनेक्टिव्हिटी मजबूत असेल तर उद्योग, आयटी, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात,' असे शिंदे यांनी सांगितले.

पुढील काळात समृद्धी महामार्ग, कोकण कोस्टल रोड, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉर यासारख्या प्रकल्पांना जोडून राज्यात ॲक्सेस कंट्रोल रस्त्यांचे जाळे उभारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'महाराष्ट्रातील कोणत्याही कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात ७ ते ८ तासांत पोहोचता येईल, अशी सक्षम दळणवळण व्यवस्था उभारत आहोत,' असे त्यांनी सांगितले.

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून हा प्रकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा ठरणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी खा. श्रीरंग बारणे, माजी नगरसेवक आबासाहेब बागुल, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि एमएसआरडीसी, एफकॉन आणि नवयुग कंपनीचे सर्व प्रमुख अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.

## डोंबिवलीत होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान सोहळा



**डोंबिवली (प्रतिनिधी):** आगरी युथ फोरम डोंबिवली यांच्या माध्यमातून लोढा चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या सौजन्याने होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान सोहळा रविवारी डोंबिवली जवळील निळजे येथील लोढा कासा बेला येथील एक्सपिरिया मॉल येथे पार पडला. यावेळी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यक देण्यात आले.

यावेळी आचार्य प्रल्हादशास्त्री महाराज, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, आ. राजेश मोरे, ज्येष्ठ नगरसेवक रमेश म्हात्रे, उपाध्यक्ष शरद पाटील, सरचिटणीस रामकृष्ण पाटील, खजिनदार पाडुरंग म्हात्रे, भास्कर पाटील (सोनारपाडा), चंद्रकांत पाटील (काटई), गजानन मंगरुळकर (घेसर), डॉ. दिनेश म्हात्रे, गुरुनाथ म्हात्रे, नगरसेवक गजानन पाटील, जलिंदर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, यावेळी जरी ७५ विद्यार्थ्यांना ही आर्थिक सहाय्य मदत दिली असली तरी पुढील वर्षीपासून १०० विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाईल असे जाहीर केले.

विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करणार असून यात आगरी युथ फोरमला ५० टक्के राखीव राहील असेही मंत्री लोढा म्हणाले.

आगरी युथ फोरमचे पदाधिकारी गुलाब वझे म्हणाले, होतकरु विद्यार्थ्यांना मदत करण्याचे ठरविले होते.

प्रत्येक विद्यार्थ्यांना १० हजार रुपये मदत म्हणून दिली आहे.

ज्येष्ठ नगरसेवक रमेश म्हात्रे म्हणाले, विद्यार्थ्यांना मदत मिळाली यासारखा आनंद आहे. भविष्यात नक्की हे विद्यार्थी डोंबिवलीचे नाव शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर सर्व क्षेत्रात आपले नाव मोठे करतील.

## खुन्याच्या गुन्ह्यातील फरार मारेकरी अडीच वर्षानंतर पोलीसांच्या जाळ्यात; नांदेडमधून अटक



**डोंबिवली (प्रतिनिधी):** खुन्याच्या गुन्ह्यातील फरार मारेकरी अडीच वर्षानंतर पोलीसांच्या जाळ्यात अडकला. याला डोंबिवलीतील विष्णुनगर पोलीसांनी नांदेडमधून अटक करुन बेड्या ठोकल्या. या गुन्ह्याखाली दोन मारेकऱ्यांना पोलीसांनी आधीच अटक केली होती. त्याचा साथीदार पकडल्या जाण्याच्या भीतीने फरार झाला होता.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिपक साहेबराव करकडे (२८, रा. परभणी) असे अटक केलेल्या साथीदाराचे नाव आहे. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी डोंबिवली पश्चिमेकडील देवीचा पाडा, स्मशानभूमी पाठीमागे, खाडीकिनारी एका अज्ञात इसमाचा मृतदेह सापडला होता.

मृतदेहाच्या डोक्यावर व कपाळावर जखमा असल्याने ही हत्या आहे असा पोलीसांना संशय होता. पोलीसांनी तपास पथक तयार करुन मारेकऱ्यांचा शोध सुरु केला. खुन्यातील मारेकऱ्यांना पकडण्यासाठी पोलीस धागादोरा शोधत होती. अखेर पोलीसांच्या तपासाला यश आले आणि या गुन्ह्यातील दोन मारेकऱ्यांना पोलीसांनी अटक करुन गजाआड केले होते. विलन विष्णु ठावरे (४१, रा. उमेशनगर) व योगेश निमाप्पा डोंगरे (४२, मोठागाव, डोंबिवली पश्चिम)

पान २ वर

## शासन आणि 'युनिसेफ' मार्फत खेळ आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे



**मुंबई:** लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८ हजारहून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशिवमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

'मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असेच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज

पान २ वर


